दै. गोदातीर दि. 22/11/2023

# ३८ दिवसानंतर खुनाचा उलगडा; तीन आरोपींना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

किनवट– किनवट येथील सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार सुरेश मस्के यांचा खून करणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तब्बल ३८ दिवसानंतर पकडले. तिन्ही आरोपी किनवट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दि. १४ ऑक्टोबर रोजी रात्री ११ च्या सुमारास सुरेश दत्तात्रय मस्के (वय ५० वर्षे रा. हमाल कॉलनी किनवट) हे त्यांच्या पत्नीला दवाखान्यातून आणण्यासाठी माहेर हॉस्पीटलकडे जात असताना हमालकॉलनी जवळील मस्जिद जवळ कोणीतरी त्यांच्या डोक्यात जबर मारहाण करुन खून केला होता. स्नेहा सुरेश मस्के यांच्या फिर्यादीवरुन किनवट येथे गुरनं २४५/२०२३ कलम ३०२ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल झाला.

सदरचा गुन्हा घडून एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला तरी सदरचे गुन्ह्याचा काहीएक उलगडा होत नसल्या कारणाने पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशा येथील फौजदार दत्तात्रय काळे यांच्या टीमला दि. १६ नोव्हेंबर रोजी आदेश दिले होते.

या पथकाने किनवट येथे जावून सतत सहा दिवस कॅम्प करुन व किनवट येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या मदतीने सदर गुन्ह्याचा बारकाईने सखोल तपास चालू केला. त्यात साक्षीदार, घटनास्थळाशेजारील साक्षीदार, तांत्रीक मदत, किनवट शहरात गोपनीय माहीतगार, मयताचे सदर भागात असलले भांडणाचे कारण असे वेगवेगळ्या पध्दतीने बौध्दीक कौशल्य वापरुन खुनातील अज्ञात आरोपीचा शोध घेतला. २१ नोव्हेंबर रोजी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीप्रमाणे शेख रिहान शेख रहीम (वय २०, व्यवसाय मजुरी रा. हमालकॉलनी किनवट) यास ताब्यात घेवून त्यास विचारपुस केली असता त्याने व त्याच्या दोन साथीदारांनी मिळून सुरेश मस्के यांचा खून केल्याची कबुली दिली. सुरेश मस्के हे शेख रिहान याच्या वडिलासोबत भांडणे करुन वडीलावर खोटी केस करण्यास लावले होते. तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत होता. तसेच कॉलनीत दादागिरी करत होता. त्यामुळे शेख रिहान शेख रहीम याने व त्याचे पाहुणे शेख आवेज ऊर्फ अबु शेख शादुल्ला (वय २२, व्यवसाय मजुरी) व शेख अशपाक शेख हसन (वय २०, व्यवसाय मजुरी दोघे रा. हमालकॉलनी किनवट) यांनी मिळून कॉलनीचे शेजारी असलेली विहीरी जवळ बसून कट रचला. सुरेश मस्के याचा खून करण्यासाठी ते आठ दिवस मागावर होते. १४ ऑक्टोबर रोजी रात्री सुरेश मस्के याचा खून केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर तिघाना ताब्यात घेवून पुढील तपासासाठी किनवट पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.



सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक अविनाशकुमार, डॉ. खंडेराय धरणे, उपअधिक्षक रामकृष्ण मळघने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, किनवटचे पोलीस निरीक्षक बी. जी. कर्हाळे यांच्या मार्गदशनाखाली फौजदार दत्तात्रय काळे, अंमलदार गंगाधर कदमं, संजीव जिंकलवाड, चालक शेख कलीम, किनवट येथील फौजदार सागर झाडे, अंमलदार गजानन डुकरे, महीला पोलीस अंमलदार वर्षा ध्रुर्वे यांनी पार पाडली आहे.